## अकरावी राज्यस्तरीय आंतरशालेय निबंध स्पर्धा

यंदाही आपल्या शाखेच्या वतीने निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेचे विषय —

१. संतांची पालखी - बिनभिंतीची शाळा
२. दिव्यत्व हीच मानव्याची खूण
३. मला 'घडविणारे' पुस्तक
४. बीज अंकुरे अंकुरे, ओल्या मातीच्या कुशीत
५. विवेक आणि संयम - जीवनाचे आधारस्तंभ !

स्पर्धेत महाराष्ट्रातील दहा शाळांमधून १८१ विद्यार्थी सहभागी झाले होते. यंदा दोन नवीन शाळा या उपक्रमात समाविष्ट झाल्या. स्पर्धेचा निर्णय -

१. प्रथम क्रमांक - कु. कल्पना कुलकर्णी
(सिटी हायस्कूल, सांगली)
२. द्वितीय क्रमांक - कु. योगिनी पाटील
(भगीरथ इंग्लिश स्कूल, जळगांव)
३. तृतीय क्रमांक - कु. श्रुती पासलकर (हुजूरपागा, पुणे)
४. उत्तेजनार्थ पारितोषिक -
(अ) कु. प्रथमेश मांडवकर (न्यू इंग्लिश स्कूल, पुणे)
(ब) कु. रुचिता हेर्लेकर (सुलोचना नातू विद्यामंदिर, पुणे)

सर्व विजेत्यांचे आणि सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन ! तसेच शालाप्रमुखांचे आभार. पारितोषिकाची रक्कम आणि प्रशस्तीपत्रके शाळांना पाठविण्यात आलेली आहेत.



## दिव्य जीवन संघ, पुणे शाखा वृत्तांत

- ऑगस्ट महिन्याचा सत्संग दि. २८ ऑगस्ट रोजी डॉ. राव यांच्या घरी झाला.
- 'दिव्य जीवन' या मासिक पत्रिकेचा अंक परिवारातील सदस्यांना वितरित करण्यात आला.


**पुणे शाखेचा पत्ता**

**श्री. गो. आ. नगरकर**
'स्वानंद' एस्. २०
सहजीवन सोसायटी
पर्वती, पुणे ४११००९
९३७०५७०२०६

**श्री. नितीन देशपांडे**
'ईशावास्य'
प्लॉट नं. ४९ /सायंतारा,
डी. एस. के. विश्व
धायरी, पुणे ४११०४१
०९८५०९३१४१७
०९८५०८२६९९०


पुस्त डाक

प्रति



# दिव्य जीवन




(दिव्य जीवन संघ, पुणे शाखा)
(ज्ञानयज्ञ म्हणून वितरित)

स्वामी शिवानंद सरस्वती

स्वामी चिदानंद सरस्वती


वर्ष ११ । अंक ८
ऑगस्ट २०१६


पुढील महिन्यात (सप्टेंबर २०१६) स्वामी चिदानंद सरस्वती यांच्या जन्मशताब्दी निमित्त आयोजित करण्यात आलेल्या विविध उपक्रमांची सांगता दि. २४ रोजी ऋषिकेश येथे पूर्णाहूती कार्यक्रमाने होत आहे. आयुष्यात वाट्याला येणारी ही एक अत्यंत दुर्मिळ संधी आहे. ऑगस्ट महिन्यात ७ ते ९ दरम्यान सांगली येथील कलावंतांनी ऋषिकेश येथे आपली सेवा रुजू केली. पुणे शाखेतील सहा सदस्य सप्टेंबरमध्ये ऋषिकेश येथे जन्मशताब्दी सांगता समारंभास उपस्थित राहणार आहेत. त्यानिमित्त ऑक्टोबर २०१६ चा दिवाळी अंक अधिक आकर्षक, देखणा आणि माहितीपूर्ण करण्याचे आम्ही ठरविले आहे. स्वामी शिवानंद सरस्वतींचे शिष्य, बावची येथील स्वामी प्रणवानंद सरस्वती यांच्याही जन्मशताब्दी निमित्त १३ डिसेंबर २०१६ रोजी बावची येथे विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्याचे ठरविले आहे. त्याचेही वृत्त ऑक्टोबर अंकात येईल.

## महिन्याचा विचार

दि. १४ जुलै २०१६ रोजी आपल्या शाखेच्या वतीने गीता धर्म मंडळ येथे आयोजित केलेल्या स्वामी शिवानंद स्मृती व्याख्यानात वक्त्या होत्या - समर्थभक्त मनीषाताई बाठे ! विषय होता - **'समर्थांचे गोविंदकाव्य !'**

स्वतः मनीषाताईंनी अकरा भारतीय भाषांचे अध्ययन केलेले आहे. समर्थ मिडिया सेंटर, पुणे या संस्थेच्या माध्यमातून त्यांची अनेक पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. तसेच काही अनुवाद प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत. त्यांनी समर्थांच्या उर्दू आणि दखनी भाषेतील साहित्यावर संशोधन करून, अभ्यासपूर्ण लेखन केलेले आहे. त्यांच्या व्याख्यानातील काही महत्त्वाचे विचार —

- समर्थांना मराठी व्यतिरिक्त हिंदोस्तानी, कन्नड, पारशी, तेलगू, गुजराथी, अरेबिक, पर्शियन, उर्दू अशा अनेक भाषा अवगत होत्या आणि त्यांनी या भाषांमध्ये लेखन केलेले आहे.
- दखनी भाषा म्हणजे खडी बोली, अरेबिक, अवधी, मैथिली, हरियाणवी, छत्तीसगढी, राजस्थानी, ब्रज, हिंदोस्थानी अशा सर्व भाषांचे मिश्रण !
- समर्थांनी १६३२ ते १६४८ या काळात भारत भ्रमण केले. त्याकाळात त्यांच्या लक्षात आले की बादशहाची हाँजी-हाँजी करण्यात ब्राह्मण मंडळी आणि गाण्या-बजावण्यात इतर समाज मग्न होता.

  अशा वेळी रासगीतांमधील शृंगारिकता काढून त्यांनी भक्ती, निसर्गवर्णन घातलं. परिणामस्वरूप अशा गाण्यांमध्ये 'मैय्या' आणली व त्यासोबत मातृभाव आला.
- रामदास स्वामींनी १८ स्त्री-शिष्यांना मठाधिपती पदी त्याकाळात नेमले होते. स्त्रीशक्तीवरील त्यांच्या विश्वासाची ही खूण आहे.
- आक्काबाई युद्धशास्त्र शिकल्या होत्या. संभाजी महाराजांनंतरच्या सज्जनगडावरील हल्ल्यात त्या लढल्या होत्या. हरल्या त्यावेळी मूर्ती पदरात बांधून त्या गडावरून निघून गेल्या. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर, पुन्हा सज्जनगडावर हल्ला करून त्यांनी गड ताब्यात मिळवला.

## ऋषिकेश वृत्तांत

स्वामी चिदानंद जन्मशताब्दी निमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात सांगली येथील कु. श्रद्धा जोशी, कुमार अभिषेक काळे आणि श्रीमती निता जोशी या कलावंतांनी आपली कला सादर केली. पहिल्या दिवशी मराठी अभंग उपस्थितांसमोर सादर करण्यात आले. दुसऱ्या दिवशी हिंदी भाषेतून स्वामींजींच्या जीवनावर आधारित किर्तन झाले. तिसऱ्या दिवशी भक्ती संगीताचा कार्यक्रम झाला. सदर कार्यक्रमांची व्हिडिओ लिंक यू-ट्यूबवर उपलब्ध आहे —

१) https://youtu.be.com/ E4SV278SHts
२)https://youtu.be.com/ET6_CV63uWY
३)https://youtu.be.com/_z7cj2sFC5c

आपणांस विनंती आहे की या दृकश्राव्य माध्यमाचा जरुर लाभ घ्यावा.

## WAVES OF JNANA GANGA

- Life is what you make it.
- Lead the life of selfless service, the life of compassion, the life of love. You will enjoy the everlasting peace of the Eternal.
- Utilise every moment of your life well.
- The spirit of man is identical with the Supreme Spirit. Man's sufferings are due to the failure to realise this identity.
- When you penetrate behind your physical, mental, and intellectual layers, you will discover then the Truth or the Spirit.
- The character of an individual is the aggregation of distinctive mental, moral, and spiritual qualities that adorn him.
- He is truly a great man who lives not for himself but for others.
- Love God above everything. This is life divine.